# नानासाहेबांचे विचार व राष्ट्रीय चर्मकार महासंघाची स्थापना

गळ्यात मडक अन् पाठीला झाडु ! चालण्याच्या पाऊल खुणा ज्या समाजव्यवस्थेला निषीध्द होत्या त्या व्यवस्थेत गमवण्याचा आणि कमविण्याचा होशाब कोण करील ? जन्माला आलं म्हणजे मरणं येत नाही तोपर्यंत व्यवस्थेनं दिलेल जोखड वाहत फिरायच ही आमची मानसिकता, क्रांतीतर दूर पण साध्या उत्क्रांतीतही अस्तीत्व नाही. दहा माणसाच्या कुटुंबात एक गडी – नोकर लागतो. तसा पाचशे हजार घराच्या गावात आमची 10 – 15 घरं त्यांची दैन्यावस्था, संघटन नाही. अन्याय अत्याचाराची दाद मागावी अशी मनात उर्मी नाही. कुठे झोपड्यात कुठे टपरीवर, कुठे उघड्यावर कुठे झाडाखाली निस्तेज, चेहऱ्यांनी हरवलेली माणसं. हातात हस्ती धरलेली फुलांच्या माळा घातलेल्या तस्बीरीसमोर खाली मान घतलेला चर्मकार माणुस . संत रविदास जयंती होत नव्हती- झाली तर चांभार वाड्यातच दिशाहीन हवालदिल अशा समाजाला आपल्या बुलंद आवाजात जाग करण्याचं काम मा. श्री. बबनराव घोलपांनी केलं आणि तो विचार चर्मकारांसाठी क्रांतीकारी ठरला.

आदरणीय बबनराव घोलप उर्फ नानासाहेब यांचे विषयी आणि राष्ट्रीय चर्मकार महासंघाविषयी सांगाव तेवढं कमीच, वाघाविषयी फारसं सांगाव लागत नाही वाघ म्हटलं की दहशत निर्माण होते. तसं वाघपण नानांना जन्मजात मिळालं असं नाही. परिस्थितीचे चटके, टप्पे, टोमणे खात गरिबीन छळून अनुभवसिध्द आलेलं वाघपण काही औरचं ! सदा चिरतरुन असतं. नाना बारा – तेरा वर्षाचे होते तेव्हापासुन आजपर्यंत काही नवीन करण्याची जिद्ध, कपडे नाही पुस्तके नाही, थीगळाच्या फाटक्या चड्डीवर नाना नव्या उमेदिने मोठे होत गेले. कुठे नोकरी कर, कोणाच्या हाताखाली काम कर असं लोक म्हणायचे पण मनात आत्मविश्वास बाळगणारा हा उमदा तरुण ! उक्ती आणि कृती यांचा मेळ क्वचितच खरा ठरतो. पण नानांनी हा मेळ सार्थ ठरविला. नाशिकच्या भाजीमंडीत भाजीपाल्याचा उद्योग करतांना, रेल्वेस्टेशनवर कार्टींग व्यवसाय करतांना तब्बल चाळीस माणसे हाताखाली ठेवून व्यवसाय करुन दाखविला.

विचार माणसाला स्वस्थ बसू देत नाही. गरीबी आणि सामाजिक झळ पोचल्यामुळे त्याचे विचार प्रगल्भ होत गेले. बाबासाहेबांची स्मारके जेवढी बौध्द समाजाने महाराष्ट्रात उभारली ती इतर मागासर्गीयांनी उभारली नाही. अस्मीता ज्याला म्हणतात, ती त्यांनी जोपासली. आम्ही मात्र तुटपूंजी रोहीदास महारांजाची मंदीरे उभारुन केलेल्या कार्यांचा उदोउदो करतो. असे नाना तऱ्हेने विचार डोक्यात येत काहीतरी हिंमतीनं पुढं येऊन करांव असं त्यांना वाटे. अनेक कला गुणांच व्यक्तीमत्व म्हणजे नाना तमाशे, लावण्या, चित्रपट अशा विविध प्रकारात निषुण, निलांबरी, शेगाविचा राणा, मेरीमर्जी, ससश्रृंगी माता, संसार माझा सोन्याचा, घरंदाज सुहासिनी आदी चित्रपटांची निर्मीती व अभिनय नानांनी केला. व नानांचा मुळचा पिंड होता तो कार्यकत्यांचा संघर्षचा अन्यांयाविरुध्द बंडकरण हे नानाच्या रक्तातच. संघर्ष पाचवीला पुजलेलाच. पण नानांनी सार्वजनिक जिवनात प्रवेश केला. 1964 पासुन शिवसेनेशी जुळले, व पक्षासाठी व समाजासाठी वाहून घेतले ते आतापर्यंत, 1985 ला शिवसेना पक्षाच्या तिकीटावर आमदारकीसाठी उभेराहिले थोड्या फरकाने पराजय झाला आणि त्यामुळे नाना खचून न जात आणखी जोमाने कार्यास लागले. 1990 साल उजाडले आणि पुन्हा बाळासाहेबांनी नानासाहेबांवर विश्वास टाकला आणि नानांनी तो सार्थ ठरविला. खुप मोठ्या फरकाने आमदार झाले. या काळात पक्ष आणि समाजात जिवाभावाची मावळे नानांनी निर्माण केले. चर्मकार समाजात मी जन्माला आलो. त्या समाजाचेही काही देणे आहे. हा विचार सतत मनात ठेवला. नानासाहेबांचे संघटन कौशल्य, स्वभाव, विदवत्ता, सामाजिक कणव पाहुन 1985 ला आमदारकीचे तिकीट बाळासाहेबांनी पुन्हा दिले. नाना 38 हजाराच्या मताधिक्क्याने निवडून आले. शिवसेना पक्ष सत्तेत आला. मा. श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. आणि नाना बनले, तेव्हाचे समाजकल्याण खात्याचे कॅबीनेट मंत्री शपथविधी झाला तेव्हा नाना बोलले, या खात्याचा मंत्री म्हणून माझ्या चर्मकार समाजासाठी व मागासवर्गीस समाजासाठी जेवढे मला भरभरुन देता येईल त्या पेक्षाही जास्त देण्याचा मी प्रयत्न करील.

नाना चर्मकार समाजाचे पहिले समाजकल्याण मंत्री चर्मकारांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. प्रत्येक जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या झुंडीच्या झुंडी भेटायला येवू लागल्या. चर्मकार समाजाचे कार्यकर्ते गटा गटाने सातपुड्यावर येवू लागले. येणाऱ्या समाज बांधवांकडे पाहतांनी त्यांचा आनंद स्पष्ट त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. हे सर्व पाहत असतांना नानासाहेबांच्या मनाला काहीतरी शल्य बोचत होते. मनात विचारांच वादळ घोंगावत होतं. समाजातील दारिद्र्यात पुढे मंत्री पदाचा आनंद फिका पडला. नाना अस्वस्थ होत. तू मंत्री पदाचे सुख भोगणार आहे ? या गरीब बांधवासाठी काय करणार आहे ? आता पर्यंत किती मंत्री झाले, आले गेले, तू ही तसाच जाशीलं ? स्वत्जे भोगले त्याची आठवण आली. अंर्तमनाने त्यांच्या मनाची बंद दारे धडाधडा उघडली. आणि सांगितले नाही, असे

कदापी होणार नाही, जो पर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेल तोपर्यंत मी माझ्या समाजाला जेवढे देणे शक्य आहे. तेवढे तन - मन - आणि धनानं देईन '. खरोखरचं ते काही दिवसात समाजाच्या प्रत्ययास आले. नाना साहेबांनी सत्तेचा फायदा समाजाला व्हावा म्हणुन दौरे काढले. गरीबी दारिद्य नवीन नव्हते. ते पाहतचं नाना मोठे झाले. पण दौ-यात जात तेव्हा जातीच्या,मागासवर्गीय माणसांची अपुलकीने ममतेने चौकशी करत, समस्या विचारत, कार्यकर्त्यांची फोन नंबर, पत्ते घेत. एखाद्या गावात मुक्काम झाला तरी चालेलं. जेथे जातील तेथे चर्मकारांच्या वस्तीला भेट देत. शिक्षणांच महत्व सांगत लोकांना ईश्वरी साक्षात्कार झाल्यासारखं वाटे. दौ-यात सत्कार होत. नानांच लक्ष मात्र माणसाच्या निस्तेज, आशाळभुत अशा हपापलेल्या चेहऱ्याकडे असायचं.मुला - बाळांची चौकशी करत. त्यांना शिक्षणाच विचारतं. शिक्षणावर विशेष भर नानांचा असे. नानांना शिक्षणाचं एवढ महत्व ! गाडगे महाराज न शिकलेले पणं चालतं बोलतं विदयापीठ ! नाना त्याच रांगेतले त्यांची समजं - उमजं विदयापीठाच्या ज्ञानापेक्षाही मोठी. बाबासाहेब म्हणाले "विदयापिठाची डिग्री आणि ज्ञानाचा संबंध नाही" त्याची प्रचिती नानांकडे पाहून येते. नाना म्हणजे सामाजिक जाणीवांच मोठं विदयापिठ !

शासकिय दौऱ्यात उभा महाराष्ट्र नानांनी पिंजून काढला. मागासवर्गीय समाजाची सामाजिक,आर्थिक ,राजकीय,सर्व परिस्थिती त्यांच्या लक्षात आली आणि नानांची झोप उडाली. माझ्या वाटयाला आलेली दुःख, कष्ट इथल्या प्रत्येकाच्या वाटयाला आहेत. थोडयाफार फरकाने हा समाज म्हणजे गरिबी , दारिद्रय,अपृश्यता,अंधश्रदधा या सर्व प्रश्नांनी घेरलेला.शिवाय अल्पसंतुष्ट गुलामगिरीच्या बेडया तोडू वाटत नाही. अशा पारंपारिक मानसिकतेच्या गुलामीचं जीणं जगणारा.स्वत:च्या सावलीला पाहून भिणारा चांभार वंशपरंपरेने चालत आलेली चांभारकी सांभाळून आहेत.सुधारणा झाली ती फक्त काही खेडयातून शहरात आली.शहरात दुकानं लावली एवढीचं ! आरी आणि रापी काही हातची सुटली नाही.बोटावर मोजण्याइतकी शिकली, सवरली शिक्षकी वर्गातचं शिकलेल्यांचा भरणा अधिक नव्यानव इतर समाजातील अधिकारी मोजावेत.तेव्हा कुठे शंभरावा चांभारांचा ! डॉ बाबासाहेबांनी जिवाचे रान करुन सांगितले *'शिका संघटित व्हा संघर्ष करा'* हा समाज संघटित केला पाहिजे मेलेली मन,हरविलेली अस्मिता घेवून जगणा-या चांभार समाजाच्या अस्मितांना जागं केलचं पाहिजे.फाटक्या पायताणात चार आठ आणे शोधाणा-या गटई कामगाराला पायरीच्या दुकानाचा मालक होता आलं पाहिजे त्यासाठी या लोकशाहीचा,या सत्तेचा, या पदाचा वापर आपण समाज जोडण्यासाठी करावा हा विचार नानासाहेबांचा पक्का झाला.

10 ऑगस्ट 1995 ला नाशिक येथे सकाही 10 वाजता बैठक बोलावली. त्यासाठी महाराष्ट्र भर फिरुन ज्या ज्या समाज बांधवांचे नंबर, संपर्क पत्ते घेतले. त्यांना बोलावण्यात आलं. सामाजिक जाणीव असणारे शंभर दोनशे कार्यकर्ते जमा झाले. सभेला सुरुवात झाली. सर्वांनी आपले विचार मांडले नाना बोलायला लागले, "माझ्या समाज बांधवांनो आपण आज पर्यंत आपल्या जिल्ह्यात , तालुक्यात गावात स्थानिक मंडळे चालवून सामाजिक सेवा केली. माझ्यापेक्षा समाजाच्या सुख - दु:खाची जाणीव आपणास जास्त आहे. पण स्थानिक संघटनेमार्फत समाजाच्या तळागाळातील बांधवांचे प्रश्न सुटणार नाहीत. कारण आजतागायत ते सुटले नाहीत आणि ते आपणास सोडवायचे असतील तर राज्यकर्त्यांना आपण आपली ताकद दाखविली पाहिजे. इतर समाजाने आपल्या समाजाची ताकद दाखवून समाजासाठी भरपूर मिळविले आहे. हा इतिहास तुम्ही आम्ही सर्वजण पाहत आहोत. आणि म्हणून आपणही संपूर्ण महाराष्ट्रातील आपल्या समाज बांधवांची एकच संधटना केली आणि या संघटनेच्या माध्यमातून आपली ताकद राज्यकर्त्यांना दाखविली तर बरेच काही प्राप्त करुन आपल्या समाजबांधवांना देवू शकतो. त्यांचा उध्दार करुन त्यांची उतराई होवू शकतो. जर आपण संघटित झालो नाही तर आपला तळागाळातील गरीब समाज असाचं तळागाळात खितपत पडून राहिलं. व त्यांच्या या अवस्थेला तुम्ही आम्ही जबाबदार असू हे विसरुन चालणार नाही. या करिता मी आपणास सविनय विनंती करतो की, आपल्या छोटया छोटया संघटना बंद करा आणि एकच एकअशी संपूर्ण महाराष्ट्रासाठी संघटना तयार करु. या संघटनेची ताकद अजोड राहिल. ही संघटना संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत राहील. आणि समाज बांधवांच्या सर्वांगीण विकासाचे काम करुन अन्यायाविरुध्द लढा देत राहील प्रसंगी वेळ आली आणि शासनाने आपल्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर मी मंत्री पदाचा मोह न ठेवता समाजासाठी राजीनामा देईल."

ज्ञानाच्या या शब्दांना तलवारीसारखी धार होती, जे बोलले ते अंतःकरणापासून अगदी कुठलाही आड पडदा न ठेवता. निश्चयाच्या या शब्दांनी उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. समाजाविषयी असलेली खरी तळमळ व त्याही पेक्षा त्यांच्या प्रत्येक वाक्यातून समाजाविषयाची आस्था, प्रेम व जिव्हाळा ओथंबून वाहत होता नानांच्या वाक्याचा परिणाम झाला. कार्यकर्ते पेटून उठले. रक्त सळसळले. एक नवा झंझावात निर्माण झाला. "संत रविदास महाराज की जय, बबनरावजी घोलप आगे बढो हम तुम्हारे साथ है" अशा ना-यांनी परीसर दुमदुमला.